MHSN060009042026

## नियमीत दिवाणी दावा क्र.७२/२०२६ मधील नि.५ वरील आदेश.

प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी दि.प्र.सं.आदेश ३९ नियम १ प्रमाणे प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या विरुध्द तुर्तातुर्त मनाई मिळावी म्हणून दाखल केलेला आहे.

२. वादीतर्फे वकील मयुरी किरण कांबळे यांचा युक्तीवाद ऐकला.

३. वादीतर्फे वकीलांनी युक्तीवाद केला की, दावा मिळकती या वादी यांच्या वडीलार्जीत व एकत्र कुटूंबाच्या मिळकती असून सदर मिळकतीस प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी बेकायदेशीरपणे दावा मिळकतीच्या सातबारा पत्रकी स्वतःचे नाव लावून घेतलेले आहे. तसेच सदर दावा मिळकतीमधील वादी यांनी त्यांचा हक्क व हिस्सा कधीही सोडून दिलेला नव्हता व नाही. त्यानंतर वादीने प्रतिवादी यांच्याकडे दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप करुन देणेबाबत विनंती केली असता प्रतिवादी यांनी त्यास नकार दिल्याने वादीस दावा दाखल करणे भाग पडले आहे. त्यामुळे सदर दाव्याच्या कामी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना वादी यांच्या दावा मिळकतीमधील कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये तसेच इतर हक्क व अधिकार निर्माण करु नयेत म्हणून एकतर्फा तुर्तातुर्त मनाई दयावी अशी विनंती केलेली आहे. वादी यांच्या विनंतीचा विचार करता वादी हिस प्रतिवादी क्र.१ ते ४ हे हरकत अडथळा करतील अथवा ति–हाईत इसमाचे हितसंबंध निर्माण करतील अशी भिती वाटत असल्याचे दिसून येते. सदर अर्जाचे कामी एकतर्फा तुर्तातुर्त मनाई देण्याइतपत प्रथमदर्शनी केस सद्य परिस्थितीत वादी यांनी अभिलेखावर आणलेली नाही. त्यामुळे सदर अर्जाच्या कामी कोणताही आदेश पारित करण्यापूर्वी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश.**

प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना कारणे दाखवा नोटीस पाठविण्यात यावी.

ANIRUDHA SUNIL RANE

Digitally signed by ANIRUDHA SUNIL RANE
Date: 2026.03.07 17:47:50 +0530

मिरज. **(श्री. ए. एस. राणे)**

दि.०७.०३.२०२६ प्र. दुसरे सह.दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मिरज.